# आरती ज्ञानरायाची

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा ।
सेविती साधु संत । मनु वेधला माझा ।।
आरती ज्ञानराजा ।। धृ.।।

लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नांव ठेविलें ज्ञानी ।।
आरती ज्ञानराजा: ।।१।।

कनकाचें ताट करीं । उभ्या गोपिका नारी ।
नारद तुंबरू हो । सामगायन करीं ।।
आरती ज्ञानराजा: ।।२।।

प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ।
रामा जनार्दनीं । पायीं टकचि ठेलें ।।
आरती ज्ञानराजा: ।।३।।